# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १३

## (सभावृत्तांत)

दिनांक–१४/०६/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक १४/०६/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर–सहशहर अभियंता,मा.डोईफोडे,मा.खोसे,मा.दंडवते,मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.खोत-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे, मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा.मोरे,मा.रत्नपारखी,मा.घुबे-कार्यकारी अभियंता,मा.लटपटे-प्रशासन अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी,मा.मोरे-सहव्यवस्थापकीय संचालक (पीएमपीएमएल), मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---

अ) दिनांक १८/०४/२०१७ रोजी व दिनांक २५/४/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २४/०५/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १०) चा सभावृत्तांत कायम कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ३१/०५/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------

ठराव क्रमांक –४९४ विषय क्रमांक – १

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – उद्यान

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/४१३/२०१७ दि.६/५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/२०/२०१६-१७ अन्वये कै.स्व.राजेश बहल उद्यान देखभाल व संरक्षण करणेकामी मे.निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हीसेस निविदा रक्कम रुपये ११,३२,३२०/- (अक्षरी र.रू.अकरा लाख बत्तीस हजार तीनशे वीस फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा **-३.००%** टक्के कमी दराने स्विकृत करून कामाचा आदेश निर्गत करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय**–उद्यान विभागाच्या गुलाबपुष्प उद्यानातून बांधकाम परवानासाठी नाहरकत दाखला दिला जातो. मा.अति.आयुक्त हे या विभागाचे प्रमुख असल्यामुळे आपण अ,ब,क,ड,इ आणि फ असे प्रभागनिहाय वेगवेगळे कर्मचारी नेमून नाहरकत दाखला देण्याचे कामकाज मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये चालू करावे.

----------

ठराव क्रमांक –४९५ विषय क्रमांक – २

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/२४२/२०१७ दि.१८/५/२०१७

विषय - सन २०१५-१६ मधिल उर्वरित संचलनतूट रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार दि.२८/०६/२०१७ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>विषय क्रमांक २ आणि ३ चे अनुषंगाने पीएमपीएमएलचे कामकाजाबाबत सभेमध्ये पुढीलप्रमाणे चर्चा झाली -</u>**

**मा.सभापती** – मला संबंधित अधिका-यांनी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत की,

१) पिंपरी चिंचवड शहराअंतर्गत पीएमपीएमएलचे कुठकुठले मार्ग चालू आहेत?

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, पुण्याकडून पिंपरी चिंचवडकडे जाणारे एकूण ४६ मार्ग आहेत.

**मा.सभापती** – अंतर्गत बसव्यवस्थेची माहिती द्यावी.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, मार्ग क्र.३०२ पिंपरीगाव ते भोसरी, मार्ग क्र.३०२ अ पिंपरीगाव ते आळंदी आणि मार्ग क्र.३०२ ब पिंपरीगाव ते बोपखेल असे आहेत. त्याचे डिटेल्स माझ्याकडे नाहीत.

**मा.सभापती** – ट्रॅफिक प्लॅनर यांना माहिती असेल, त्यांनी सांगावे.
२) बोपखेल इथे कुठून कुठे गाडी जाते ते सांगावे?

**मा.राजू मिसाळ** – मा.सभापती, आज या साहेबांना पाठवले आहे. तुमच्या विनंतीला मान देवून मुंढे साहेब ही येतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. मला आपल्याला विनंती करायची आहे की, पीएमपीएमएल या विषयावर स्वतंत्र बैठक आयोजित करावी.

**मा.सभापती** – मोरे साहेबांनी आम्ही जे प्रश्न विचारणार आहोत, ते लिहून घ्यावेत. तुम्हाला पूर्ण शहराची माहिती आहे.
३) NH4 हायवे व्यतिरिक्त पिंपरीगाव ते भोसरी किंवा भोसरी पासून रावेत, वाकड, तळवडे, हिंजवडी, बालेवाडी, निगडी, भोसरी MIDC, चिंचवड MIDC ला जाणा-या एकंदरीत अंतर्गत बस किती आहेत?
४)पुणे-बेंगलोर हाय-वे ला बरेच कॉलेजेस आहेत. तिथे जाण्या-येण्यासाठी शहर अंतर्गत किती बसेस धावत आहेत?

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, आपलेकडून प्रत्येक महिन्याला रु.५ कोटी मिळाले आहेत. तूट रु.५ कोटी ६ लाख मिळणे अपेक्षित आहे. प्रति महिना ६ लाख याप्रमाणे १२ महिन्यांचे एकूण र.रु.७२ लाख म्हणजे रु.५ कोटी ७२ लाख येणे बाकी आहेत.

**मा.सभापती** – आपण ४० टक्के हिस्सा प्रमाणे संचलन तूटीची रक्कम सांगितली आहे.
५) पिंपरी चिंचवड शहरातील कुठले कुठले मार्गांवर संचलन तूट आली आहे, ही तूट असण्याची कारणे काय आहेत?
गाडी नाही, ड्रायव्हर नाही, पर्यायी माणूस दिला नाही, अशा कारणांसाठी तूट दाखवली आहे. परंतू ६) जर गाडी बंद पडत असेलतर त्याचे कारण काय आहे?
७) कुठल्या-कुठल्या मार्गांवर जास्त गाड्या बंद पडत आहेत?
८) सीएनजी गाडी किंवा डिझेल गाडी बंद पडत असेल, किंवा संचलन तूटीची यापेक्षा वेगळी काय कारणे आहेत का?

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, संचलन तूट म्हणजे पीएमपीएमएल यांना उत्पन्न रु.१००/- मिळाले असेल, खर्च रु.१५०/- आला असेल तर रु.५०/- ही तूट मानतो.

व्यवहारीक तूट म्हणतो तशाप्रकारची ही तूट नसून उत्पन्न कमी मिळाल्यामुळे निर्माण झालेली तूट असा याचा अर्थ आहे.

**मा.सभापती** – आपण आम्हाला उत्पन्न किती झाले हे दाखवत नाहीत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने २००७ पासून आजपर्यंत एकूण रु.६०० कोटी इतके पीएमपीएमएल यांना दिले आहेत. या वर्षी दीडशे ते पाऊणे दोनशे कोटी इतके देणार आहोत. पासचा विषय असो, बस खरेदीचा विषय असो, आम्ही आपल्याला वेळोवेळी पैसे देणार असू तर आम्हाला हे कळाले पाहिजे.
९) कुठल्या मार्गावर सर्वात जास्त तूट होते आहे?
पीसीएमटी असताना शहरात असलेली अंतर्गत बसव्यवस्था आता बंद केली गेली आहे. पीसीएमटी असताना सगळे चांगले होते.
१०) जे रूट बंद केले गेले त्या त्रुटींचे कारण सांगावे.

संचलन तूटीची रक्कम देण्याबद्दल दुमत नाही. परंतू आम्ही दरवर्षी संचलन तूटीची रक्कम आंधळेपणाने देतो आहोत.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, या रकमेचे ऑडीट केले जाते.

**मा.सभापती** – तुमचे कित्येक वर्षांचे ऑडीट झालेले नाही. आत्ता ट्रॅफीक प्लॅनर का आले आहेत. काय माहिती सांगण्यासाठी इथे आले आहेत. संचलन तूट कशी दाखवता याचा आम्ही अभ्यास करणार आहोत.
११) पिंपरी चिंचवड मधील महिला व मुलींकरिता शहराअंतर्गत बसव्यवस्था आम्हाला पाहिजेच आहे. पुढील वेळी येताना याचे ठोस उत्तर घेऊन यावे. ही बसव्यवस्था किती दिवसांत सुरु करणार आहोत.
१२) जे मार्ग बंद केले आहेत, ते बंद करण्याआधी स्थानिक नगरसेवक असतील, अधिकारी असतील यांना आपण कळवले होते का? जे बस मार्ग बंद केले आहेत, ते बंद करण्यामागील कारणे सांगावीत.

**मा.वैशाली काळभोर–**बस-डे ला महिलांसाठी सेपरेट बसचे ओपनिंग केले होते, त्याचे काय झाले?

**मा.सभापती–**१३) सकाळ वृत्तपत्राने बस-डे चे आयोजन केले होते. त्यावेळी पीएमपीएमएलने महिलांसाठी स्वतंत्र बस चालू केली होती. ती बस-डे नंतर का बंद केली गेली?

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, शासनाने तेजस्विनी बस योजना सुरु केली आहे.

**मा.सभापती –** आपण पीएमपीएमएलच्या बैठकीत सांगितले होते की, पुणे शहरात असे सहा मार्ग चालू केले आहेत. मग आमच्याकडे का चालू केले नाहीत. आम्हाला सुद्धा असे रुट चालू करुन पाहिजे आहेत.

विषय क्रमांक ३ची माहिती देत असताना देय रकमेचे बायफरकेशन व्यवस्थित सांगितले गेले नव्हते. पीएमपीएमएल यांनी प्रति कि.मी. रु.६४/- याप्रमाणे आमच्याकडून पैसे घेतले आहेत.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, शिक्षण मंडळाने केलेल्या मागणीनुसार बसचा पुरवठा केला होता. सहा तासांसाठी रु.६०९०/- अशी दर आकारणी केली आहे.

**मा.सभापती-**सहा तासांपेक्षा कमी वेळ बस वापरली असेलतर आपण त्याची दर आकारणी कशी करणार आहात?

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, विद्यार्थ्यांसाठी सवलतीच्या दराने बस दिल्या आहेत.

**मा.सभापती–**बसमधून उभे राहून जी मुले आली होती, त्यासाठी सुद्धा प्रती कि.मी. रु.४/- असा दर लावला होता, हे खरे आहे का?

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, रु.२/- असा दर लावला होता. संचालक मंडळाने जसा निर्णय घेतला होता, त्याप्रमाणे दर आकारणी केली आहे. बील सादर केले आणि ते मंजूर करुन दिले असे होत नाही. याचे लेखापरिक्षण केले जाते.

**मा.सभापती-**सायन्स पार्कपासून अर्ध्या किलोमीटरवर शाळा असेल तरीदेखील रु.६०९०/- असाच बसचा दर आपण लावला आहे का?

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, ज्या दिवसाकरिता बस दिली जाते, त्या बसच्या त्या दिवसाच्या फे-या बंद ठेवल्या जातात. ते बंद करुन या बसेस उपलब्ध करुन दिल्या जातात.

**मा.सभापती –** आपणास या स्थायी समिती सभेमध्ये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत, तोपर्यंत विषय क्रमांक २ आणि ३ हे दि.२८/०६/२०१७ चे सभेपर्यंत तहकूब ठेवणेत येत आहेत.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.सभापती,पीएमपीएमएलमध्ये सन्मा.मुंढे साहेबांनी कार्यभार स्विकारल्यानंतर पीएमपीएमएलचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सेवेत असलेले किती कर्मचारी परत पीएमपीएमएलमध्ये बदली करुन गेले आहेत?

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, पीएमपीएमएल आस्थापनेवरील १७८ लोक होते. ते आमच्याकडे घेतले आहेत. ते विविध डेपोत अलॉट केले आहेत.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.सभापती, इकडील डेपोत काम करणा-या लोकांना पुण्यात नेले अशा कर्मचा-यांची संख्या किती आणि त्यांना तिकडे का नेले याचे कारण सांगा.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)**– मा.सभापती, ६६ लोक आहेत. एखाद्या डेपोला कर्मचारी कमी/जास्त होतात.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.सभापती, मुंढे साहेब आल्यानंतरच तुम्हाला त्यांना घ्यावेसे का वाटले? तीन डेपोंच्या मॅनेजर यांनी सांगावे. आत्ता किती रुटस् चालू आहेत, किती बस धावत आहेत? तुम्ही चुकीची माहिती सांगायची, त्याचा त्रास नागरीकांनी भोगायचा. पीएमपीएमएल ही संस्था कधीच फायद्यात चालणार नाही, ही फॅक्ट आहे.
मागील पंधरा दिवसांत काही लोक बदली होऊन तिकडे गेले आहेत. कोथरूड, पुणे स्टेशन डेपोला जाण्यासाठी ते पहाटे ३ वा. घर सोडतात. तिथे गेल्यावर त्यांना ड्युटी मिळत नाही. मग तुम्ही त्या कर्मचा-यांना निगडी डेपो, पिंपरी डेपोला बोलवल्यानंतर त्यांना ड्युटी दिली जाते, असे किती कर्मचारी आहेत याची आकडेवारी सांगावी.

**मा.सभापती –** मा.शेंडगेताई, मोरे साहेबांना तुमचे प्रश्न द्या. ते दि.२८ जून पर्यंत माहिती घेऊन येतील.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.सभापती, २००७ मध्ये पूर्व पीसीएमटी आणि पीएमटीतील एकूण बस संख्या किती होती? त्यावेळी पीसीएमटी आणि पीएमटीमध्ये असणारे रुटस् कुठलेकुठले होते? २०१७ मध्ये पिंपरी चिंचवडमध्ये किती सर्वीस स्टेशन्स चालू आहेत? कुठले रुटस् चालू आहेत? निगडी डेपोला दरमहा किती बसेसचे काम केले जात होते? पीएमपीएमएलचे पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये किती सर्वीस स्टेशन्स किंवा वर्कशॉप्स आहेत? या सर्वीस स्टेशन्समधून दरमहा किती बसचे काम केले जाते? याची माहिती काढल्यास तुम्हाला आमच्यातला आणि त्यांच्यातला फरक समजेल.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक)** – मा.सभापती, पुण्यातला मध्यवर्ती वर्कशॉप आणि निगडीतला वर्कशॉप असे दोनच वर्कशॉप आहेत.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.सभापती, किती बस इन झाल्या, किती आऊट झाल्या. निगडी वर्कशॉप स्टेशन बंद करायचे कारण काय? दोन्ही डेपोंमधील इंजिन बंद असणा-या, त्याचबरोबर दिर्घकाळ बंद असणा-या, नॉन-यूज बसेसची संख्या सांगा. या बसेस कधीपासून बंद होत गेल्या? बंद झाल्यानंतर त्यांचे पुढे काय केले? याचा तपशील द्यावा. पुण्यातून पिंपरी चिंचवडमध्ये वाकडेवाडी मार्गे आणि शिवाजीनगर मार्गे जाणा-या बसेसची एकूण संख्या किती? मुंढे साहेबांनी कार्यभार घेण्याआधी या दोन्ही मार्गांवरील रुटवर असणा-या बसेसची संख्या किती होती आणि सध्या किती आहे? आपण पुढील सभेस येताना मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे घेऊन यावीत. तुम्हाला सगळ्यांना विनंती आहे की, मुंढे साहेबांना त्यांच्या कार्यशैलीने काम करु द्यावे. गवळी साहेब असतील, वाघमारे साहेब असतील कधीतरी त्यांच्या कानात जाऊन सांगा. मुंबईमध्ये बेस्ट सारखी संस्था चांगले काम करते आहे. तुमच्या बसगाड्या जो धूर सोडत असतात, त्याने शहरात प्रदूषण निर्माण होते. तुम्ही आमच्याकडून पैसे घेऊन आमच्यावरच मेहेरबानी दाखवता की, आम्ही शहरातील नागरीकांसाठी काहीतरी करतो. प्रत्यक्षात तुम्ही काहीच करत नाही.

तुमच्या बस शहरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण निर्माण करतात. तुमची बस पुढे चालली असेलतर मागून टू व्हिलरवरून जाणारा मनुष्य गाडी चालवू शकत नाही. हे शहर आपले आहे, असा कधीतरी विचार करा. धन्यवाद.

**मा.सभापती –** मा.आशा धायगुडे-शेंडगे यांनी जे-जे प्रश्न विचारले आहेत, मोरे साहेबांनी त्याची माहिती घेऊन यावे. अध्यक्ष मुंढे साहेब यांनी महापालिकेत यावे असे आमचे आग्रहाचे निमंत्रण आहे, असे आपण त्यांना सांगावे.

-----------

**निर्णय**-१) स्थायी समितीने जे-जे प्रश्न विचारले आहेत, त्याची सर्व माहिती पीएमपीएमएलचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री.मोरे यांनी घेऊन यावे. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत विषय क्रमांक २ आणि ३ हे दि.२८/०६/२०१७ चे सभेपर्यंत तहकूब ठेवणेत येत आहेत.

२) पीएमपीएमएलचे अध्यक्ष श्री.तुकाराम मुंढे साहेब यांनी महापालिकेत यावे असे स्थायी समितीकडून आग्रहाचे निमंत्रण असून सभेस उपस्थित असलेल्या पीएमपीएमएलच्या अधिका-यांनी त्यांच्या तसे निदर्शनास आणून द्यावे.

------------

ठराव क्रमांक – ४९६ विषय क्रमांक – ३

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/४८/२०१७ दि.१९/५/२०१७

विषय– सायन्स पार्क भेटीच्या देय बीलाबाबत तसेच पिंपरी चिंचवड विज्ञान केंद्रास भेटीकामी पुरविणेत आलेल्या प्रासंगिक करारावरील बिलाबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार दि.२८/०६/२०१७ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४९७ विषय क्रमांक – ४

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – क्रीडा

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/२५५/२०१७, दि.२०/०४/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ०७ दिनांक १२/०५/२०१७ नुसार अतिरिक्त आयुक्त यांचे कडील आदेश क्र. क्रिडा/७अ/कावि/२३५/२०१७ दि.४/३/२०१७ अन्वये मे वरदायिनी एन्टरप्रायजेस, चिंचवड १९ यांना कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाज, त्यांनी यापुर्वी केलेल्या करारनाम्या प्रमाणे पुन्हा करारनामा करून पहिल्या वर्षाचे मंजूर दराने दरमहा र.रू.९७,०२०/- (अक्षरी र.रू.सत्यान्नव हजार वीस फक्त) या दराने दिनांक ०९/०४/२०१६ ते दिनांक ०८/०४/२०१७ या १ वर्षे कालावधीचे कामाचे आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ४९८ विषय क्रमांक – ५

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – दक्षता व नियंत्रण कक्ष

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दवनि/कावि/२/८३/२०१७ दि.२२/५/२०१७

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगवी स्मशानभूमीत पर्यावरणपूरक गॅस शवदाहिनी बसविणेच्या कामाचा आर्थिक व तांत्रिक सल्ला अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडून घेणेबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार दि.२८/०६/२०१७ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** स्थायी समितीपुढे ठळक मुद्दे आणावेत व त्यावर निर्णय घ्यावा.

----------

ठराव क्रमांक – ४९९ विषय क्रमांक – ६

दिनांक – १४/०६/२०१७

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.बाळासाहेब ओव्हाळ,मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव -

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १६ दिनांक २६/०५/२०१७ नुसार संत तुकारामनगर येथील संत तुकाराम महाराज पुतळया मागील महानगरपालिकेची व्यायामशाळा हनुमान स्पोर्टस् अॅकॅडमी, हनुमान हेल्थ क्लब, मोरे वस्ती, साई मंदिरामागे चिखली पुणे ४१२ ४११ रजिस्टर नं.महाराष्ट्र १९६१/२०११ पुणे यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५०० विषय क्रमांक – ७

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१२०/२०१७ दि.३/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.14-2016/17 मधील अ.क्र.7 अन्वये फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत चिखली गावठाण येथे नव्याने बांधणेत येणा-या मनपा शाळेचे विद्युतीकरण करणेकामी (वाढीव मजले बांधकाम) मे.अथर्व इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस नि.र.रू.37,34,093/- (अक्षरी र.रू. सदतीस लाख चौतीस हजार त्र्याण्णव फक्त) पेक्षा 11.23% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५०१ विषय क्रमांक – ८
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/२१/२०१७ दि.१/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७५/०१/२०१६-१७ मधील काम क्र.१ अन्वये, प्रभाग क्र.६ मधील सेक्टर क्र.४ मधील मोकळया जागेवर उद्यान विकसित करणेकामी मे.एस एस साठे निवीदा र.रु.१,४५,१५,४२९/-(अक्षरी र.रू.एक कोटी, पंचेचाळीस लाख पंधरा हजार, चारशे एकोणतीस फक्त) पेक्षा १६.५०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,२७,२६,४०२/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधणकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५०२ विषय क्रमांक – ९
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/२०/२०१७ दि.१/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६४/०६/२०१६-१७ मधील काम क्र.५ अन्वये, प्रभाग क्र.४५ पिंपरी वाघेरे येथील जोग महाराज उद्यानाचे नूतनीकरण करणेकामी (भाग-२) मे.संकल्प् इन्फ्रास्ट्रक्चर निवीदा र.रु.१,८५,००,६४४/- (अक्षरी र.रू.एक कोटी, पंच्याऐंशी लाख, सहाशे चव्वेचाळीस फक्त) पेक्षा १६.००% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,६३,१७,५६८/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधणकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५०३ विषय क्रमांक – १०
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग–ब क्षेत्रीय कार्यालय,आरोग्य
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेआ/५/कावि/४०३/२०१७ दि.३/६/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्टॉर्म वॉटर चेंबर्स साफसफाई करुन गाळाची वाहतूक करणेकामी मे.श्री जगन्नाथ महिला स्वयं. सेवा सह. संस्था मर्या. यांनी दिलेला कमी दर म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कम रू.९,५८,४१०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख अठ्ठावन्न हजार चारशे दहा फक्त) या

रकमेपेक्षा ४७.३४% कमी प्रमाणे र.रु.५,०४,६७०/- इतका दर सर्वात लघुत्तम असल्याने त्यांना कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** १) सर्व प्रभागांतून किती संस्थांना काम दिले आहे, एकंदरीत किती कर्मचारी काम करतात, किती ठेकेदार/संस्थांचा, किती कामगारांचा पीएफ/ईएसआय भरला गेला आहे, कोणकोणत्या व किती ठेकेदारांचा पगार केलेला नाही, याची माहिती प्रभाग अधिका-यांकडे मागितली होती. सभेमध्ये प्रभाग अधिका-यांना विचारण्यात आलेली माहिती बरोबर घेऊनच त्यांनी सभेस उपस्थित रहावे. अन्यथा त्यांनी सभेस उपस्थित राहणे उचित होणार नाही.

२) एकूण संस्था आणि संस्थानिहाय कर्मचारी किती आहेत याची माहिती द्यावी. किती ठेकेदारांनी अटी-शर्तीची पूर्तता केली नाही हे सर्व प्रभाग अधिका-यांनी सांगावे. अन्यथा सगळ्या प्रभाग अधिका-यांना दंड करण्यात येणार आहे.

३) ठेकेदारांनी कामगारांचा ईएसआय व पीएफ भरल्याची जी यादी सादर केली आहे, त्याबाबत असे निदर्शनास आले आहे की, त्यातील निम्मी नावे ही बोगस आहेत. ठेकेदाराने त्यांच्याच घरातील लोकांची नावे यात टाकून ती यादी सादर केली असल्याचे निदर्शनास आले आहे. ज्या व्यक्तींनी आपल्याकडे कधीच काम केलेले नाही, त्यांची नावे व आय-डी कार्ड स्थायी समितीकडे आहेत. सगळी निविदा प्रक्रिया जलद

गतीने झाली पाहीजे. वेळकाढूपणा केल्याचे दिसते आहे. अधिका-यांना नोटीस बजवावी.

५) काही ठेकेदार कामगारांना पगार देत नसल्यामुळे त्या कामगारांनी काम थांबवले आहे, याबाबत काय कार्यवाही करणार याबाबत प्रशासनाने माहिती देवून त्वरित कार्यवाही करावी.

६) मा.इंदलकर साहेब यांनी या कामगारांचा पी.एफ./ई.एस.आय. भरलेबाबत यापूर्वी सूचित केलेप्रमाणे वेळकाढूपणा न करता कामकाज गांभिर्याने पूर्ण करावे.

७) पुढील सभेपर्यंत सगळ्या मुद्यांवर संपूर्ण आणि अंतिम अहवाल सादर करावा.

८) प्रभागातून ठेकेदारांना बीले अदा केली जातात, त्यामुळे जबाबदारीत कसूर झाल्यास यास प्रभाग अधिकारी जबाबदार राहतील. मा.आयुक्त यांनी तशा सूचना प्रभाग अधिका-यांना द्याव्यात.

----------

ठराव क्रमांक – ५०४ विषय क्रमांक – ११

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – वैदयकिय मुख्य कार्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.वैद्यकिय संचालक यांचे जावक क्र.वैद्य/९/कावि/६९३/२०१७ दि.३/६/२०१७

मा.वैद्यकिय संचालक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

राज्य शासनाचे आदेशानुसार दरवर्षी प्रमाणे सन २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम २९ जानेवारी २०१७ रोजी राबविण्यात आली. सदर मोहिम कामकाजासाठी बुथ दिवशी म.न.पा.ची वाहने उपलब्ध नसल्याने वाहने भाडयाने घेणेकामी वैद्यकिय विभागाकडील 'शासकिय योजनांची अंमलबजावणी' या लेखाशिर्षामधुन वैद्यकिय संचालक पिंपरी चिंचवड

महानगरपालिका यांचे नावे र.रु.८८,५००/- (अक्षरी र.रू.अठ्याऐंशी हजार पाचशे फक्त) अगाऊ काढुन खर्च करणेत आलेले आहेत त्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५०५ विषय क्रमांक – १२

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/२ब/कावि/५९/१७ दि.५/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५९/०१/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.२३ क्रांति ज्योति सावित्रीबाई फुले रुग्णालयाची देखभाल दुरूस्ती करणेकामी (सन २०१६-१७ साठी) मे. आदित्य एंटरप्रायझेस नि.र.रु.४६,६७,६८०/- (अक्षरी र.रु.शेहचाळीस लाख सदुसष्ट हजार सहाशे ऐंशी फक्त) पेक्षा १६.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.४१,११,९९३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधणकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५०६ विषय क्रमांक – १३

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१७४/२०१७ दि.०५/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.21/2016/2017 मधील अ.क्र.3 अन्वये फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत साने चौक ते चिखली गावठाण रस्ता दुभाजकामध्ये दिवाबत्तीची सोय करणेकामी २०१६-१७ मे.एन एस इलेक्ट्रीकल कॉर्पोरेशन नि.र.रू.46,68,214/- (अक्षरी र.रू.शेहचाळीस लाख अडोसष्ठ हजार दोनशे चौदा फक्त) पेक्षा 16.52 % कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधणकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५०७ विषय क्रमांक – १४
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/४/कावि/३१३/२०१७ दि.३१/०५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या माध्यमिक विद्यालयामध्ये चालु शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ करीता बंद अवस्थेत असलेल्या केयानची वार्षिक देखभाल व दुरुस्ती तसेच अदययावत अभ्यासक्रम उपलब्ध करणे आवश्यक असल्याने शिक्षण मंडळ कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या दरांमध्ये मे.ग्लोबल एज्युकेशन ऍन्ड टेक्नॉलॉजी सोल्युशन्स, पुणे ४६ यांची रु.रु.२९,८२५/- वार्षिक प्रति शाळा खर्च व अभ्यासक्रम लोड करणेकामी रु.रु.२२,१५५/- वार्षिक प्रति शाळा खर्च अशी सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे. त्यानुसार मनपाचे १८ माध्यमिक विद्यालयांसाठी र.रु.५१,९८०/-प्रमाणे एकूण र.रु.९,३५,६४०/- इतका वार्षिक खर्च येणार आहे. तरी मनपाच्या १८ माध्यमिक विद्यालयामधील केयानची वार्षिक देखभाल व दुरुस्ती तसेच अदययावत अभ्यासक्रम उपलब्ध करणेकामी येणा-या र.रु.९,३५,६४०/- च्या खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच संबंधितांबरोबर करारनामा करणेस व पुरवठा आदेश निर्गत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५०८ विषय क्रमांक – १५
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५२५/२०१७ दि.५/६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/०८/२०१६-१७ अन्वये दादा दादी उद्यान देखभाल संरक्षण करणेकामी मे.राजमाता अहिल्यादेवी स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा रक्कम रुपये ९,७०,५६०/- (अक्षरी र.रू. नऊ लाख सत्तर हजार पाचशे साठ फक्त) पेक्षा ३६.००% टक्के कमी दराने स्विकृत करणेत आली असुन कामाचा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५०९ विषय क्रमांक – १६
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – उद्यान
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/५२६/२०१७ दि.५/६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/११/२०१६-१७ अन्वये रामबाग उद्यान उद्यान देखभाल संरक्षण करणेकामी मे.राजमाता अहिल्यादेवी स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा रक्कम रुपये ६,४७,०४०/-(अक्षरी र.रू.

सहा लाख सत्तेचाळीस हजार चाळीस फक्त) पेक्षा २९.५०% टक्के कमी दराने स्विकृत करणेत आली असुन कामाचा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५१० विषय क्रमांक – १७

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/६२/२०१७ दि.०५/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

सन 2016-17 चे अंदाजपत्रकामध्ये मजुर पुरविणेच्या नवीन कामास पुरेशी तरतूद नसल्यामुळे सदरचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करता आली नाही. सद्यस्थितीत सन २०१५-१६ करिता जलक्षेत्र क्र.ड/9 ते 15 पाण्याच्या टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पद्धतीने मजुर पुरविणे या कामाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही काम उपलब्ध नाही, त्यामुळे सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देणेकामी किमान 1-2 महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी विषयांकित काम पुढे चालु ठेवणे आवश्यक आहे.सदर कामाची निविदा रक्कम रु.48,81,528/- इतकी असून सदर काम चालु ठेवणेकरिता वाढीव खर्चाची आवश्यकता आहे. सदर कामाला मा.महापालिका सभा ठराव क्र.663 दि.06/04/2015 अन्वये र.रु.70,00,000/- इतकी प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामास ३ महिनेची मुदतवाढ घेतल्यास येणा-या वाढीव खर्चाची रक्कम (रु.6,51,335 प्रति महिना X 3 महिने =19,54,005/-)रु.19,54,005/- इतकी येत आहे व त्यानुसार होणा-या एकूण खर्चाची रक्कम रु.65,13,350/- इतकी होत आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये ठेकेदार यांचेमार्फत प्रस्तुत कामातुन मजुर कर्मचारी पुरविणे योग्य व सोयीचे वाटते. सदर ठेकेदार यांचा प्रस्तुत कामाचा पुर्वानुभव लक्षात घेता विषयांकित वाढीव काम मे. समीप सर्व्हिसेस यांचेमार्फत करुन घेणे सोयीचे वाटते. तसेच ठेकेदार यांचा स्विकृत निविदा दर 6.60% कमी याचा विचार करता संबंधित काम या ठेकेदारामार्फत केले असता, मनपाचे आर्थिक हिताचे होईल, असे मत आहे. सदर कामासाठी सन 2017-18 च्या नवीन कामाची निविदा प्रक्रीया या विभागामार्फत अद्याप अंतिम न झाल्याने कामाची आवश्यकता व महत्व लक्षात घेवून मे.समीप सर्व्हिसेस यांच्याकडून जुने काम पुढे चालु ठेवण्यात यावे असे मत आहे. या विभागामार्फत नवीन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत ३ महिने म्हणजेच दि.31/07/2017 पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे व त्यासाठी मुळ निविदा रक्कम रू.48,81,528/- च्या अधिक येणा-या वाढीव र.रु.19,54,005/- अशी एकूण रक्कम रू.65,13,350/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच यापुर्वी विषयांकित कामाचे निविदा रक्कम रू.48,81,528/- या रक्कमेस मा.स्थायी समिती ठराव क्र.15125, दि.11/2/2016 अन्वये मंजूरी मिळाली आहे व आता सुधारित रक्कम रू.65,13,350/- (मुळ निविदा रक्कम रू.48,81,528/- + वाढीव रक्कम रू.19,54,005/-) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५११ विषय क्रमांक – १८
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/४९३/१७ दि.५/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७८/१/२०१६-१७ प्रभाग क्र.१५ आकुर्डी दत्तवाडी मधील स्व. मधुकर आण्णा पवळे पुतळ्याच्या परिसराचे सुशोभिकरण करणेकामी **M/s.H.C.Lunkad** नि.र.रु.४५,७५,५५५/- (अक्षरी र.रू.पंच्चेचाळीस लाख पंच्याहत्तर हजार पाचशे पंच्चावन्न फक्त) पेक्षा १२.५०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.४२,०३,७९१**/-** पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१२ विषय क्रमांक – १९
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/४९२/१७ दि.५/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७८/२/२०१६-१७ प्रभाग क्र.१९ वाल्हेकरवाडी पेठ क्र.२९ परिसर विकसित करणेकामी **M/s.H.M.Construction** नि.र.रू.३५,०१,३९७/-(अक्षरी र.रू.पस्तीस लाख एक हजार तीनशे सत्याण्णव फक्त) पेक्षा ११.१२% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.३२,६७,६४४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१३ विषय क्रमांक – २०
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – नगरसचिव
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/५७०/२०१७ दि.०३/०६/२०१७

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१४ विषय क्रमांक – २१

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – दूरसंचार

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/२/कावि/४९/२०१७ दि.०६/०६/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

करसंकलन विभागामार्फत मिळकतकर १००% वसुली करणेकामी, मोठ्या थकबाकीदारांकडे मिळकतकर वसुलीचा पाठपुरावा करणे, मिळकतधारकांशी संपर्क साधणे, २०१७-२०१८ ची सवलत योजना जास्तीत जास्त मिळकतधारकांपर्यत पोहोचविणेकामी इत्यादी करिता मा. स्थायी समितीची मान्यता मिळालेचे दिनांकापासून ते माहे ३० जून २०१७ पर्यत विभागीय करसंकलन कार्यालयांतील मे.BSNL व मे.IDEA यांचे दूरध्वनी व FCT ना मोबाईल डायलिंग सुविधा देणे आवश्यक असून त्यापोटी येणा-या संपूर्ण खर्चाचे बील अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१५ विषय क्रमांक – २२

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:-मा.वैद्यकीय अधिक्षक यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/२२६/२०१७ दि.०६/०६/२०१७

मा.वैद्यकीय अधिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या सेंट्रल गॅस प्लांटचे Anest Iwata कंपनीचे ०४ नग Air Compressors ची दुरुस्ती करणेकामी ई-निविदा सुचना क्र.०१/२०१६-१७ अन्वये निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त निविदाधारकांपैकी एकमेव पात्र निविदाधारक व Anest Iwata कंपनीचे अधिकृत वितरक मे.साईसमर्थ मेडीकल & सर्जिकल, पुणे यांनी सादर केलेला दर र.रु.१,०७,०००/- प्रती नग हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१४% ने कमी असल्यामुळे स्विकृत करणेत आलेला असुन त्यांना करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्यामुळे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णाल्याच्या सेंट्रल गॅस प्लांटचे Anest Iwata कंपनीचे ०४ नग Air Compressors ची दुरुस्ती Anest Iwata कंपनीचे अधिकृत वितरक मे.साईसमर्थ मेडीकल & सर्जिकल, पुणे यांचेकडून त्यांनी सादर केलेला दर र.रु.१,०७,०००/- प्रती नग(सर्व करांसह) प्रमाणे करारनामा करणेस तसेच सदर कॉम्प्रेसर्सची दुरुस्ती करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.४,२८,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख अठ्ठावीस हजार फक्त) चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१६ विषय क्रमांक – २३

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/१४८६/२०१७ दि.०६/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५०/१-२०१६-१७ बीआरटीएस रस्त्यावर ठिकठिकाणी Toilet-Urinal Block बांधणेकामी मे.एनडीए प्लॅस्टीक नि.र.रु.३७,७१,२३३/- (अक्षरी

र.रू.सदोतीस लाख एक्काहत्तर हजार दोनशे तेहतीस फक्त) पेक्षा १.९९% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३८,८०,९९५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१७ विषय क्रमांक – २४

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१७६/२०१७ दि.०७/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.27/2016-17 मधील अ.क्र.2 अन्वये मुंबई पुणे रस्त्यावरील निगडी ते दापोडी पर्यतचे वाहतूक नियंत्रक दिव्यांचे प्रणालीत सुधारणा करणेकामी (वाहतूक नियंत्रित होऊन अपघाताचे प्रमाण कमी होईल) मे.जे.पी.ट्रॅफिक अँटोमेशन प्रा. लि. नि.र.रू.1,40,05,124/- (अक्षरी र.रू. एक कोटी चाळीस लाख पाच हजार एकशे चौवीस फक्त) पेक्षा 1.20% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५१८ विषय क्रमांक – २५

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भः- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.क्षेत्रीय/आ/३/कावि/३४२/२०१७ दि.०७/०६/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२ २०१७-२०१८ अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्ट्रॉम वॉटर चेंबर्स सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ.वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवून देणेकामी मे.आण्णासाहेब मगर स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. निविदा र.रू.५,३७,७८६/-(अक्षरी र.रु. पाच लाख सदोतीस हजार सातशे शहाऐंशी फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरा पेक्षा ३८.६०% कमी ठेकेदाराकडून र.रू.३,३०,०००/- या प्रमाणे ठेकेदारबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्यांचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – भोसरीमध्ये पाणी साचलेल्या खड्यात पडून एक मुलगा मृत पावला. शहरात ज्या-ज्या ठिकाणी महापालिकेची कामे चालू असतील, अशी ठिकाणी अधिका-यांनी योग्य ती पुरेपूर काळजी घ्यावी.

----------

ठराव क्रमांक –५१९ विषय क्रमांक – २६
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१७५/२०१७ दि.०७/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.27/2016-17 मधील अ.क्र.1 अन्वये मुंबई पुणे रस्त्यावरील बीआरटीस मार्गावरील मुख्य चौकातील वाहतूक नियंत्रक दिव्याच्या प्रणालीत सुधारणा करणे अंतर्गत सर्व बीआरटीस कॉरीडॉर करीताच्या सिग्नल यंत्रणेकरीता सल्लागार नेमणूकीकामी मे.ग्लोबल ट्रॅफिक सोल्युशन्स नि.र.रू.65,00,000/- (अक्षरी र.रू. पासष्ट लाख फक्त) पेक्षा 1.50% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५२० विषय क्रमांक – २७
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/८४/१७ दि.२/६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.४३ ते ४८, ५४ ते ५७ मधील स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफसफाई करुन गाळाची वाहतुक करणेकामी नि.नो.क्र.२/२०१७-१८ निविदा र.रु.१४,३२,८५४/- वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले होते. सदरची निविदा दि.२२/०५/२०१७ रोजी उघडण्यात आली आहे. सदर निविदेच्या अनुषंगाने मे.श्री संत साई स्वयंरोजगार सेवा संस्था यांनी अंदाजपत्रकीय र.रु.१४,३२,८५४/- (अक्षरी र.रू.चौदा लाख बत्तीस हजार आठशे चौपन्न फक्त) पेक्षा ०९.५०% कमी ने म्हणजेच र.रु.१२,९६,७३३/- च्या खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –५२१ विषय क्रमांक – २८
दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/९०/१७ दि.७/६/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.73/1/2016-17 अन्वये प्रभाग क्र.५९ मधील प्रसुतीगृहचे नुतनीकरण करणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी मे.साईराज कन्स्ट्रक्शन नि.र.रू.14,00,551/- (अक्षरी रक्कम रुपये चौदा लाख पाचशे एक्कावन्न फक्त) पेक्षा 10.00% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.13,23,521/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल

करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५२२ विषय क्रमांक – २९

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/४/कावि/३१२/२०१७ दि.३१/५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमूद बाबींचा विचार करता मनपाच्या १८ माध्यमिक विद्यालयातील इ.८ वी ते १० वीचे अंदाजे ७८९० विद्यार्थ्यांना किंवा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील प्रत्यक्ष हजर विद्यार्थी संख्येनुसार उपरोक्त शैक्षणिक साहित्य शिक्षण मंडळाकडील निविदा मंजूर दराने निविदाधारक मे.कौसल्या पब्लिकेशन, बिबवेवाडी,पुणे-३७ यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजित र.रु.२५,५६,०००/- च्या खर्चास अथवा प्रत्यक्ष येणाया खर्चास तसेच संबंधितांबरोबर करारनामा करणेस व पुरवठा आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५२३ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १४/०६/२०१७ विभाग – औद्योगिक प्रशिक्षण संस्था

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक– मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसं/४/कावि/५०३/२०१७ दि.७/६/२०१७

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी यांचेकडील प्रस्तावात नमूद कर्मचा-यांना मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल याचिका क्र.२५६६/२००५ दाव्यानुसार मे.उच्च न्यायालयाचे यांच्या आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.२९/०५/२०१७ रोजी एक दिवस सेवाखंड देवून दिनांक ३०/०५/२०१७ ते २९/११/२०१७ पर्यंत सहा महिने कालावधीकरीता हंगामी नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी या ठिकाणी मानधनावर काम करीत असलेले निदेशक कर्मचारी दिर्घकाळ मानधनावर काम करीत आहेत. सध्याची महागाई विचारात घेता सदर कर्मचा-यांच्या दरमहा मानधनात प्रत्येकी र.रु.१०,०००/- वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** १) स्थायी समितीच्या पहिल्या बैठकीपासून प्रत्येक बैठकीमध्ये स्थायी समिती सभापतींनी जे-जे आदेश/निर्णय दिले आहेत, ते आदेश आणि त्यासमोर त्याची अंमलबजावणी कितपत झाली आहे, प्रशासनाने याचा एक चार्ट तयार करुन सादर करावा.

२) मोरवाडी आयटीआय येथील शिक्षिका श्रीमती अलका कुंभार यांना पुन्हा कामावर घेण्यासाठी मा.आयुक्त साहेबांशी सकारात्मक चर्चा करुन ताबडतोब कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/४९/२०१७
दिनांक - २९/०६/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.